स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय
महाराष्ट्र राज्य
सहावा मजला, कोकण भवन
नवी मुंबई ४००६१४

स्थायी आदेश क्रमांक १६/२०१७, दिनांक 20 SEP 2017

---

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थेत पूर्वी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातील अधिका-यांची स्थानिक निधी लेखापरिक्षा जिल्हा कार्यालयात नियुक्ती झाल्यावर त्यांना द्यावयाचे कामकाज.

प्रस्तावना:- स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषदा) येथे पूर्वी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गातील अधिकारी (सहाय्यक लेखा अधिकारी, लेखा अधिकारी, सहाय्यक संचालक) यांची बदली अथवा पदोन्नतीने स्थानिक निधी लेखापरीक्षा जिल्हा कार्यालयात पदस्थापना झाल्यास त्यांनी ज्या कालावधीकरिता स्थानिक स्वराज्य संस्थेत कामकाज केले असेल त्या कालावधीचे लेखापरीक्षणाचे काम देण्यात यावे किंवा कसे याबाबत जिल्हा कार्यालयांकडून विचारणा होत आहे. या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश:-</u>** स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषदा) येथे पूर्वी सेवेत असलेल्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संवर्गातील अधिकारी (सहाय्यक लेखा अधिकारी, लेखा अधिकारी, सहाय्यक संचालक) यांची बदली अथवा पदोन्नतीने स्थानिक निधी लेखापरीक्षा जिल्हा कार्यालयात पदस्थापना झाल्यास त्यांनी ज्या कालावधीकरिता स्थानिक स्वराज्य संस्थेत कामकाज केले असेल त्या कालावधीचे लेखापरीक्षणाचे कामकाज देण्यात येऊ नये. त्यांना सदर कालावधीचे केवळ वार्षिक लेखे तपासणीचे काम देण्यात यावे. तथापि सदर अधिका-यांना उक्त कालावधीचे इतर स्थानिक स्वराज संस्थांचे लेखापरीक्षणाचे काम देता येईल.

सदर आदेशातील सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य

प्रत :- सर्व सहसंचालक व जिल्हा सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा यांना उचित कार्यावाहीस्तव.